आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१४ डिसेंबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ‘एक देश-एक निवडणूक’शी संबंधित दोन विधेयकं लोकसभेत सोमवारी सादर केली जाणार
- देशातल्या सर्व मुख्य सचिवांची परिषद प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली सुरु
- तारणाविना कृषी कर्जाच्या मर्यादेत ४० हजार रुपये वाढ
- महाराष्ट्रात मंत्रिमंडळाचा शपथविधी उद्या नागपुरात होणार
- महिला कनिष्ठ गट हॉकी आशिया चषक स्पर्धेत आज भारताचा सामना जपानबरोबर

**आणि**

- काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री E V K S एलंगोवन यांचं आज चेन्नई इथं दीर्घ आजारानं निधन

**<><><><><>**

‘एक देश-एक निवडणूक’शी संबंधित दोन विधेयकं लोकसभेत सोमवारी सादर केली जाणार आहेत. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल संविधान सुधारणा विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदा सुधारणा विधेयक लोकसभेत मांडतील.

‘एक देश – एक निवडणूक’ या संकल्पनेची पडताळणी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीच्या शिफारसी नुकत्याच सरकारने स्वीकारल्या असून देशभरात एकाचवेळी निवडणूका घेण्याचा मार्ग मोकळा

झाला आहे.माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील समितीने विविध राजकीय पक्षांसह तज्ञांशी याबाबत विस्तृत चर्चा केली. या अंतर्गत निवडणूक प्रक्रिया दोन टप्प्यात राबवली जाईल. पहिल्या टप्प्यात लोकसभेची निवडणूक आणि सर्व राज्यांच्या विधानसभा निवडणुका घेतल्या जातील. तसंच या निवडणुका झाल्यानंतर शंभर दिवसांच्या आत दुसऱ्या टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जातील.

**<><><><><>**

लोकसभेत आज भारतीय संविधानाच्या पंच्याहत्तर वर्षांनिमित्त आयोजित विशेष चर्चासत्रात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे सहभागी होणार आहेत. आज चर्चासत्राची सुरुवात संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजेजू यांनी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान निर्मितीतील योगदानाचं त्यांनी यावेळी कौतूक केलं. देशाने स्वातंत्र्यानंतर प्रत्येक नागरिकाला समान अधिकार दिले आहेत. अल्पसंख्याकांसोबत कोणताही भेदभाव केला जात नाही आणि त्यांना कायदेशीर संरक्षण असल्याचं रिजिजू म्हणाले. देशातील सहा अल्पसंख्याक समुदायांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविल्या जात असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. काल या चर्चासत्रात केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांच्यासह विविध पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी आपापले विचार मांडले.

**<><><><><>**

देशातल्या सर्व मुख्य सचिवांची चौथी राष्ट्रीय परिषद नवी दिल्लीत होत असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी परिषदेच्या अध्यक्षस्थानी आहेत. केंद्र आणि राज्यसरकारांमधला ताळमेळ वाढवण्याच्या दृष्टीनं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून या परिषदेची सुरुवात झाली. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेची संकल्पना उद्योजकता, रोजगार आणि कौशल्यविकासाला प्रोत्साहन – लोकसंख्या समीकरणाचे फायदे अशी आहे. परिषदेला काल प्रारंभ झाला असून आज समान विकास आराखड्यावर राज्यसरकारांच्या सहभागातून काम याविषयावर आज चर्चा होत आहे. सर्व राज्यांचे आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव, आणि विविध क्षेत्रातले तज्ञ परिषदेला उपस्थित आहेत.

**<><><><><>**

अभिव्यक्ती आणि संवाद यांचा मध्य साधेल अशाप्रकारे भारतीय लोकशाही केंद्रस्थानी आणणं आवश्यक असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत टपाल आणि दूरसंचार लेखा आणि वित्त सेवेच्या ५० व्या स्थापना दिन कार्यक्रमात बोलत होते. अभिव्यक्ती आणि संवाद परस्परांना पूरक असून दोन्हींमधील सुसंवाद ही यशाची गुरुकिल्ली असल्याचं धनखड यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मतदार याद्यांची योग्य तपासणी केल्यानंतरच त्यात सुधारणा आणि नावं हटवण्याची प्रक्रिया करा, असे निर्देश केंद्रीय निवडणूक आयोगानं दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पत्राद्वारे दिले आहेत. मतदारांची नावं

हटवण्याच्या प्रक्रियेत अधिकाधिक राजकीय पक्षांना सामावून घ्यावं, असंही या पत्रात नमूद करण्यात आलं आहे.

मतदार याद्यांमधून अवैध आणि तात्पुरत्या स्थलांतरित तसेच बोगस मतदारांची नावे हटविण्याचा भारतीय जनता पक्षाने मांडलेला मुद्दा या पत्रात नमूद करण्यात आला आहे. मतदार यादीतून मोठ्या संख्येने मतदारांची नावे हटवली गेल्याच्या आम आदमी पक्षाच्या आरोपांचाही या पत्रात उल्लेख करण्यात आला आहे.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं तारणाविना कृषी कर्जाची मर्यादा १ लाख ६० हजार रुपयांवरून २ लाख रुपये करण्याची घोषणा केली आहे. येत्या १ जानेवारीपासून हा निर्णय लागू होईल. यामुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त आर्थिक सहाय्य प्रदान होईल असं कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. कर्ज वितरण सुलभ झाल्यानं किसान क्रेडिट कार्ड कर्जाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कृषीविषयक घटकांमध्ये अधिक गुंतवणूक करता येईल असंही या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या नवनिर्वाचित सरकारच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी उद्या रविवारी सायंकाळी चार वाजता नागपूर इथं राजभवनात होणार आहे. राजभवनातून ही माहिती देण्यात आली. येत्या सोमवारपासून राज्य सरकारचं हिवाळी अधिवेशन नागपुरात होत आहे. त्याच्या पूर्वसंध्येला हा

मंत्रिमंडळ विस्तार केला जाणार आहे. दरम्यान, मंत्र्यांची यादी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडे पाठवली असून तेथून मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित आमदारांना सूचित केलं जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांना दिली.

यापूर्वी ५ डिसेंबर रोजी मुंबईत एका भव्य समारंभात देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेत नवं सरकार स्थापन केलं आहे.

**<><><><><>**

विशेष गरज असलेल्या व्यक्तींच्या कल्याणासाठी सरकार वचनबद्ध असून दिव्यांग व्यक्तींसाठी अनेक विशेष योजना राबवत असल्याचं केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी म्हटलं आहे. ते काल तेलंगणात सिकंदराबादमध्ये मानसिक दुर्बल सबलीकरण राष्ट्रीय संस्था इथं दिव्यांग व्यक्तींना शैक्षणिक सामग्रीचं वाटप केल्यावर बोलत होते. या संस्थेतल्या विदयार्थ्यांना उत्कृष्ट सुविधा मिळाव्यात यासाठी केंद्र सरकार सर्वतोपरी मदत करेल अशी ग्वाही त्यांनी दिली. यानंतर त्यांनी ब्रेल पार्क इथं 'ब्रेल फॉर ऑल' प्रशिक्षण संस्थेचं उदघाटन केलं.

**<><><><><>**

भारत आणि संयुक्त अरब अमिराती दरम्यान संरक्षण क्षेत्र आणि सुरक्षा सहकार्य वाढवण्याची गरज असल्याचं प्रतिपादन परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल नवी दिल्ली इथं केलं. संयुक्त अरब अमिरातीचे परराष्ट्र व्यवहार मंत्री शेख अब्दुल्ला बिन झायेद बिन अल नाह्यान यांच्यासोबत

झालेल्या 15 व्या भारत-UAE संयुक्त आयोगाच्या बैठकीत डॉ. जयशंकर बोलत होते.

**<><><><><>**

दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष यून सुक येओल यांच्याविरोधात देशाच्या संसदेत दुसऱ्यांदा महाभियोग प्रस्ताव आणला जात आहे. हा प्रस्ताव मंजूर होण्यासाठी संसदेतल्या तीनशे सदस्यांपैकी दोनशे सदस्यांचा पाठिंबा असणं आवश्यक आहे. त्यानंतरच हे प्रकरण घटनात्मक न्यायालयात जाईल. त्यानंतर यून सुक येओल यांच्या कॉन्झर्वेटिव्ह पीपल्स पॉवर पार्टीच्या आठ सदस्यांना महाभियोग का आवश्यक आहे हे विरोधी पक्षाने पटवून देणं अनिवार्य आहे. कालच सत्ताधारी पक्षाच्या सात सदस्यांनी महाभियोगाला पाठिंबा दर्शवला आहे.

**<><><><><>**

महिला कनिष्ठ गट हॉकी आशिया चषक स्पर्धेत आज भारताचा सामना जपानबरोबर होणार आहे. ओमानची राजधानी मस्कत इथं ही स्पर्धा होत असून गेल्या गुरुवारी थायलंडवर भारताने ९ - ० असा दणदणीत विजय मिळवला होता. या विजयामुळे भारत उपांत्यफेरीत पोहोचला, तसंच पुढच्या वर्षी चिलीमधे होणाऱ्या एफआयएच कनिष्ठ गट जागतिक हॉकी स्पर्धेसाठी देखील पात्र ठरला आहे. आजचा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी ६ वाजता सुरु होईल. दुसरा उपान्त्य सामना चीन आणि दक्षिण कोरियामधे होणार आहे.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान ऑस्ट्रेलियात गॅबा इथं सुरु असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतल्या आज सुरु झालेल्या तिसऱ्या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण स्विकारलं. मात्र, पावसाच्या वारंवार व्यत्ययामुळे आजच्या दिवसाचा खेळ थांबवावा लागला. आजचा खेळ थांबला तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या बिनबाद २८ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री आणि आमदार E V K S एलंगोवन यांचं आज चेन्नई इथं दीर्घ आजाराने निधन झालं. ते ७५ वर्षांचे होते. द्रविड चळवळीचे प्रणेते ई व्ही रामासामी पेरियार यांचे भाऊ ई व्ही कृष्णसामींचे ते नातू होत. एलंगोवन २००४ ला गोपीचेट्टीपलयम मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आले होते. २००४ ते २००९ या काळात संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारमध्ये त्यांनी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री म्हणून काम केलं होतं. एरोड पूर्व मतदारसंघातून तामिळनाडू विधानसभेतही ते दोनदा निवडून आले होते.

**//<><><><><>//**